# साकार

# SAKAR

**S**ociety for **A**doption **K**nowledge **A**wareness & **R**esource

## वार्षिक अहवाल

## एप्रिल २०२० ते मार्च २०२१

# साकार

# SAKAR

**S**ociety for **A**doption **K**nowledge **A**wareness & **R**esource

“अजमेरा कॉम्पलेक्स”, प्लॉट नं. १७७, ज्योतीनगर मेन रोड,
ज्योतीनगर, औरंगाबाद - ४३१ ००५ (म. रा.)
फोन नं. - (०२४०) २३४७०९९, मो. नं. - ९६७३१०१७६०
ई-मेंल - sakaradoption@gmail.com,
वेबसाईट -www.sakar.org.in

## वार्षिक अहवाल

## एप्रिल २०२० ते मार्च २०२१

Income Tax Exemption Certificate
No. ABD/CIT/TECH/80G/SAKAR/39/05/2010-11
FCRA Registration no. 08375011 (Social)

Registered under the Societies Registration Act 21 of 1860
No. MAHA/599/96/A’ BAD
&
Bombay Public Trust Act of 1950
Registration no. AF-3875 (A’ BAD)

# प्रास्ताविक

**सस्नेह नमस्कार,**

जागतिक महामारी ने ग्रासलेल्या, २०२०-२१ या वर्षात अत्यंत जोखमीचं काम होतं, ते म्हणजे, इवल्याशा तान्हु ल्याचे करोना पासून संरक्षण, बाल रोग तज्ञांच्या देखरेखी खाली नर्स, आया आणि इतर सर्व कर्मचारी यांनी या संकटाची चाहूल जाणली व त्यानुसार संरक्षणासाठी यांच्या निष्ठापूर्वक आणि सतर्कतेने दिलेल्या सेवां मुळेच करोना च्या संकटाची दृष्ट छाया, शिशु गृहातील बालकांना बाधित करू शकली नाही, ही या वर्षीची फार मोठीच उपलब्धी म्हणावी लागेल. यासाठी शिशु गृहाच्या प्रमुख आशा नानिवडेकर, राधिका मुळे आणि माधुरी शब्दे यांनी डोळस व अथक प्रयत्न केले.

वारंवार उद्भवलेल्या लॉकडाउनच्या स्थितीमुळे संस्थेतील नियमीत व विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी बऱ्याच मर्यादा पडल्या. तरीही शक्य झाल्यास प्रत्यक्ष व शक्य न झाल्यास अप्रत्यक्षरीत्या म्हणजेच ऑनलाईन पद्धतीने यावर्षी कार्यक्रम साजरे केले गेले. यात आवर्जून उल्लेख करण्यासारख्या दोन उद् बोधन कार्यशाळा होत. “करोना महामारी चा सामना कसा करावा” आणि “करोना समज-गैरसमज” या दोन कार्यशाळांमधून मिळालेल्या मार्ग दर्शनांचे, आया आणि कर्मचारी यांनी वेळोवेळी अवलंब केल्याने करोना च्या पहिल्या लाटेत त्यांनी स्वतःचे व पर्यायाने बाळांचे आरोग्य सांभाळले. अर्थात कार्यशाळे बरोबरच, कोविड पासून बाळांना लांब ठेवण्यासाठी सतत नियमांचे काटेकोर पालन होण्याच्या दृष्टीने, निगराणी ठेवणे आणि शिशुगृहात प्रवेश न करण्याची पथ्य इतर नागरिकांप्रमाणेच सर्वच कार्यकारी मंडळाने पाळणे, हे अगदी स्वयंस्फूर्त होतं. म्हणूनच या काळातील, संस्थेला वारंवार भेटी देणाऱ्या शासनाच्या पाहणी पथकाने संस्थेच्या कामाचे कौतुक केले.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही ‘साकार’ कटीबद्ध असलेल्या उदिष्टांच्या केंद्रस्थानी दत्तकाच्या कार्यात थोडीही कसर ठेवली गेली नाही. याही परिस्थितीत दत्तकाचे कार्य नेटाने चालू ठेवले. सदरील अहवालात त्याची सांख्यिकी पुढील पानांवर अंतर्भूत केली. ती याची साक्षीदार आहे.

दत्तक प्रचार आणि प्रसाराचे कार्य, संस्थेत यंदा आरोग्य कर्मचाऱ्यांच्या गटां बरोबर आयोजित केले गेले. यात अंगणवाडी सेविका यांचा समावेश होता. तसेच बाळांची व आयांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

“देणे समाजाचे” या उपक्रमात सहभागी होण्याचे, २०२०-२१ हे साकार संस्थेचे दुसरे वर्ष होते. या उपक्रमात महामारी मुळे खंड पडू नये याची पूर्णतः खबरदारी आर्टिस्ट्री च्या संस्थापिका वीणाताई गोखले यांनी घेतली आणि अतिशय कल्पकतेने ऑनलाइन पद्धतीने कार्यक्रमाचे आयोजन केले व यात सहभागी संस्थांचे कार्य देशाबाहेरील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य केले. त्यांच्या या अनमोल कामाबद्दल, विशेषतः साकारच्या कार्याची माहिती, देशातील व देशाबाहेरील लोकांपर्यंत पोचविण्यासाठी साकारला संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल, साकार त्यांची अत्यंत ऋणी आहे.

औरंगाबाद इलेक्ट्रिकल्स प्रायव्हेट लिमिटेड येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी साकार संस्थेस भेट देऊन संस्थेच्या कार्याबद्दल माहिती घेतली व शिशू संगोपन केंद्राचे कामकाज जाणून घेऊन, त्यास सामाजिक दायित्व अंतर्गत आर्थिक योगदान दिल्याबद्दल साकार संस्था त्यांची अत्यंत आभारी आहे.

मॅन एनर्जी सोल्युशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ,ग्रुप रिपोर्टिंग, वाळूज ,औरंगाबाद यांनी यावर्षीही सामाजिक दायित्व निधी अंतर्गत साकार संस्थेस बहुमोल मदत केली, त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार.

"महिंद्रा टेक" या पुण्यातील नामवंत कंपनीच्या सामाजिक दायित्व निधी प्रकल्पाच्या प्रमुख व प्रकल्पसहकारी यांनी साकार संस्थेस भेट देऊन शिशू संगोपन गृहातील बालकांसाठी व आयांसाठी भरघोस मदत केल्याबद्दल ,त्यांचा ऋणनिर्देश!

कोविडच्या काळात समाजाची आर्थिक स्थिती विस्कटल्याने ,अनेक सामाजिक संस्थांना आर्थिक विवंचेतून जावे लागले,मात्र याही काळात समाजाने,साकार संस्थेस फार मोलाचे सहकार्य करून, साकारप्रती दर्शविलेल्या आपुलकीबद्दल साकार कृतज्ञ आहे.

साकार संस्थेच्या कार्यात विशेष सहकार्य करणारे औरंगाबाद येथील बाल कल्याण समितीचे अध्यक्ष/सदस्य, महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय आणि जिल्हा बाल संरक्षण अधिकारी कार्यालय तसेच सन्माननीय जिल्हा व सत्र न्यायालय औरंगाबाद या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

वर्षानुवर्षे साकार संस्थेस तत्परतेने व्यवसायिक सेवा पुरविणाऱ्या, सर्वांचा अंतःकरण पूर्वक ऋणनिर्देश!

**सुचित्रा देशपांडे**
सचिव
साकार संस्था, औरंगाबाद

# शिशु संगोपन गृह

'शिशु संगोपन गृह' हे साकार संस्थेत प्रवेशित होणाऱ्या 0 ते 6 वर्ष वयोगटातील प्रत्येक बाळाचे दत्तका पूर्वीचे 'घर' आहे. वीस बालकांची क्षमता असलेल्या या शिशु गृहात बालकांच्या शारीरिक वाढीसाठी, ज्याप्रमाणे पोषक आहार आणि आरोग्याची काळजी घेतली जाते त्याच प्रमाणे मानसिक विकासासाठी उत्तेजना आणि समुपदेशन यासारख्या सेवा पुरवल्या जातात तसेच त्यांच्यासाठी शैक्षणिक आणि मनोरंजनाच्या सुविधा पण उपलब्ध करून दिल्या जातात. बालक पूर्णतः अनाथ असेल किंवा मातेने परित्याग केले असेल किंवा पालकांनी अव्हेरलेले असेल तर बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार शिशू संगोपन गृहात दाखल केले जाते. बालकांचा प्रवेश आणि त्यांच्या दत्तक विधानाची सद्यस्थिती खाली दर्शविलेल्या सांख्यिकीच्या आधारे स्पष्ट होईल.

या बालकांचा प्रवेश, दत्तक विधान व सद्यस्थिती (Current Status) यांची सांख्यिकी खालीलप्रमाणेः

## १) अनाथ/परित्यागीत/सोडलेले

## [Orphan/Relinquish/Abandon (O/R/A)]

### बालकांच्या प्रवेशाची सांख्यिकी (१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१)

| अ.क्र. | प्रवेशाचा प्रवर्ग | २०२० - २०२१ संस्थेत प्रवेशित बालके संख्या | | मागील वर्षातील प्रवेशीत बालके (०१ एप्रिल २०२०) | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | मुले | मुली | |
| १ | O/R/A | ०६ | ०६ | ०५ | १० | **२७** |
| | | **१२** | | **१५** | | |

## २) दत्तक विधान प्रक्रिया सांख्यिकी

| मुले/ मुली | दत्तक विधान प्रक्रीया पूर्ण झालेली बालके | | दत्तक विधान प्रक्रीया चालू असलेली बालके | | ६ वर्षे पूर्ण झाल्यावर स्थलांतरीत | मृत्यू | ३१ मार्च २०२१ रोजी पटावरील संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | देशांतर्गत दत्तक विधान | देशाबाहेरील दत्तक विधान | देशांतर्गत दत्तकपूर्व संगोपनात पालकांना सुपूर्द | देशाबाहेरील दत्तक विधान प्रक्रीयेत | | | |
| मुले | ०५ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०६ |
| मुली | १० | ०१ | ०१ | ०० | ०२ | ०० | ०९ |
| **एकुण** | **१७** | | **०१** | | **०३** | **००** | **१५** |

या वर्षी देशांतर्गत १५ व देशाबाहेर ०२ दत्तक विधान प्रक्रीया पूर्ण झाल्या आहेत. ०१ बालिका देशांतर्गत (दत्तक पूर्व संगोपनासाठी) दत्तक पालकांकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. अशाप्रकारे एकुण ०१ बालिका न्यायालयाच्या दत्तकविधान आदेशाच्या प्रतिक्षेत आहेत. २०१९ - २०२० या आर्थिक वर्षात तात्पुरत्या निवासासाठी आलेल्या ०२ बालिका वयाची सहा वर्ष पुर्ण झाल्यामुळे बाल कल्याण समिती औरंगाबाद यांच्या आदेशाने दुस-या संस्थेत स्थलांतरीत केली आहेत.

# तात्पुरत्या निवासासाठी प्रवेशित बालकांचे विवरण

तात्पुरत्या निवासासाठी आलेल्या बालकांचे, त्यांच्या नैसर्गिक कुटुंबाचा गृहअभ्यास केल्यानंतर त्या कुटुंबात पुर्नवसन करण्यात येते. आणि ६ वर्षानंतर बालकांना अन्य संस्थेत स्थलांतरित करण्यात येते. तात्पुरत्या निवासासाठी आलेल्या बालकांचे विवरण खालील प्रमाणेः

## अ) तात्पुरत्या निवासासाठी प्रवेशित बालकांची सांख्यिकी

| अ.क्र. | वर्षे | प्रवेशित बालक | | एकुण |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| १ | २०२० - २०२१ | ०१ | ०१ | ०२ |

## ब) तात्पुरत्या निवासासाठी प्रवेशित व नंतर पूर्नवसित झालेल्या बालकांची सांख्यिकी

| अ.क्र. | विवरण | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | नैसर्गिक कुटुंबात पुनर्वसीत झालेली बालके | ०० | ०० | |
| २ | दुस-या संस्थेत स्थलांतरीत झालेले बालके | ०१ | ०० | **०१** |
| | **एकुण** | **०१** | **००** | |

२०२० - २०२१ या आर्थिक वर्षात तात्पुरत्या निवासासाठी आलेल्या ०२ सखे भाऊ - बहिण प्रवेशित झालेले आहेत. त्यापैकी ०१ भावाला वयाची सहा वर्ष पुर्ण झाल्यामुळे दुस-या संस्थेत स्थलांतरीत करण्यात आले आहे.

## ३)एकुण प्रवेशित बालकांची महिनावार सांख्यिकी

| अ.क्र. | प्रवर्ग | ०१ एप्रिल २०२० | | | | | | | | | ३१ मार्च २०२१ | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टें | ऑक्टों | नोव्हें | डिसें | जाने | फेब्रु | मार्च | |
| १ | अनाथ/ परित्यागित पोलिसां मार्फत आलेली बालके | ०० | ० | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०४ | ०३ | ०१ | ०० | ०१ | ०० | **१२** |
| २ | तात्पुरत्या निवासासाठी आलेली बालके | ०० | ० | ०० | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | **०२** |
| | | | | | | | | | | | | | **एकुण** | **१४** |

# दत्तक अनुषंगिक सेवा

## १. दत्तकपूर्व सेवा - यामध्ये खालील सेवा समाविष्ट आहेत.

- दत्तकेच्छुक पालकांना आवश्यक सर्व माहिती देऊन संगणकीय ऑनलाईन नोंदणी करण्यासंदर्भात योग्य मार्गदर्शन करणे.
- नोंदणीकृत दत्तकेच्छुक पालकांचे गृहभेटीदरम्याण समुपदेशन करणे व गृह अभ्यास अहवाल करुन ऑनलाईन अपलोड करणे. - २०२० - २०२१ या आर्थिक वर्षात एकुण १४ पालकांच्या गृहभेटी करुन काराच्या - केअरिग्सवर अपलोड करण्यात आल्या.
- मा. न्यायालयात दत्तकासाठी याचिका दाखल करण्यापूर्वी, दत्तकेच्छुक पालकांची व बालकांची प्रत्यक्ष भेट.
- दत्तकपूर्व बालसंगोपनाचा करारनामा करणे (Pre adoption Foster Care Agreement).
- कायदेशीर दत्तक विधान याचिका (Petition) मा. जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल करणे.

## २. दत्तक प्रक्रिये दरम्यानच्या सेवा -

- दत्तकेच्छूक पालकांना कायदेशीर दत्तक प्रक्रियेमध्ये मदत करणे.
- दत्तक पालकांना न्यायालयीन आदेश मिळवून देण्यास मदत करणे.

## ३. न्यायालयीन आदेशानंतरच्या सेवा -

- दत्तक बालकाचे जन्म प्रमाणपत्र प्राप्त करुण देणे.
- विदेशी दत्तक विधान असल्यास पासपोर्ट मिळेपर्यतची सर्व प्रक्रिया पूर्ण करणे.
- न्यायालयात पालकांची याचिका (Petition) दाखल केल्यापासून पुढील दोन वर्ष (प्रत्येक सहा महिन्याला एक) दत्तक पालकांची गृहभेट घेऊन बालकाचा प्रगती अहवाल (Follow up Report) ज्या संस्थेनी या पालकांचा गृह अभ्यास अहवाल केलेला आहे. त्या संस्थेला सादर करणे व ऑनलाईन अपडेट करणे. - २०२० - २०२१ या वर्षात दत्तकविषयी न्यायालयीन एकुण १८ पालकांची गृहभेट घेऊन बालकाचा सद्यस्थीतीबाबत प्रगती अहवाल (Follow up Report) तयार करण्यात आला.

# दत्तक संकल्पना - प्रचार व प्रसार

दत्तकाच्या कार्यात दत्तक संकल्पनेचा प्रचार व प्रसार करणे याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समाजातील सर्व स्तरापर्यंत दत्तकाचे प्रचार कार्य अव्याहतपणे चालू ठेवण्याची निकड असली तरी आणि त्याप्रमाणे ते कार्य साकार संस्थेमार्फत होत असले तरीही, बाल दिनापासून पुढे एक आठवडा 'दत्तक जाणीव जागृती सप्ताह' म्हणून दर वर्षी साजरा केला जातो. यावर्षी करोना चा संसर्ग होऊ नये, म्हणून नियमांचे काटेकोरपणे पालन करून दत्तक जाणीव-जागृती सप्ताहांतर्गत विविध कार्यक्रमांद्वारे, सामाजिक योगदान प्राप्त झाले. या वर्षीच्या दत्तक जाणीव जागृती सप्ताहाचे ब्रीदवाक्य **"मी सुरक्षित तर माझा परिवार सुरक्षित"** हे होते.

| अ. क्र. | दिनांक | कार्यक्रम | वक्ते/उपस्थिती | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | १४/११/२०२० | उद्घाटन समारंभ आणि बालकांच्या शाररीक वाढीचे मापन अंगणवाडी सेविका यांच्या मदतीने बालकांच्या विकासाचा, वाढीचा तक्ता तयार केला. | १. **सुनिता हरिभाऊ सावंत,** अंगणवाडी सेविका, सातारा परिसर<br>२. **सौ. निता चांदे,** अंगणवाडी सेविका, सातारा परिसर<br>३. **श्रीमती भारती काळे,** अंगणवाडी सेविका, सातारा परिसर | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |
| २ | १५/११/२०२० | संस्थेचे हितचितक, महाविद्यालयीन व शाळेतील विद्यार्थ्यांच्या भेटी | देणगीदार, महाविद्यालयीन व शाळेतील विद्यार्थी | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |
| ३ | १६/११/२०२० | बालकांची आरोग्य तपासणी | संस्थेच्या बालरोग तज्ञ डॉ. प्राची पटेल | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |
| ४ | १७/११/२०२० | संस्थेतील कर्मचा-यासाठी आरोग्य तपासणी | प्रसिध्द स्त्रीरोग तज्ञ डॉ. वीणा पानट | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |
| ५ | १८/११/२०२० | दैनिक वृत्तपत्रात माहिती देऊन दत्तक जाणीव जागृति सप्ताहाचा प्रचार व प्रसार केला | दैनिक महाराष्ट्र टाईम्स | -- |
| ६ | १९/११/२०२० | १. संस्थेतील कर्मचा-यासाठी विविध खेळांचे आयोाजन आणि बक्षीत वितरण.<br>२. दत्तक दिलेल्या बाळांच्या पालकांसोबत, बाळांच्या विकासाचा आढावा. | १. संस्थेच्या सचिव सुचित्रा देशपांडे व कोषाध्यक्ष राधिका मुळे<br>२. दत्तक दिलेल्या ०६ बाळांच्या पालकांसोबत विचारपूस व आढावा घेतला | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |
| ७ | २०/११/२०२० | ३ ते ६ वयोगटातील बालकांसाठी चित्रकला स्पर्धाचे आयोजन व बक्षीत वितरण. | चित्रकला शिक्षीका धनश्री शास्त्री | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | २१/११/२०२० | दत्तक जाणीव जागृति सप्ताहाचा समारोप | १. **डॉ. सविता पानट**, अध्यक्ष, साकार संस्था.<br>२. **डॉ. निलिमा पांडे,** उपाध्यक्ष, साकार संस्था.<br>३. **सुहास वैद्य,** कार्यकारी सदस्य, साकार संस्था.<br><br>१. **मा. ॲड. ज्योती पत्की**, अध्यक्ष, बाल कल्याण समिती, औरंगाबाद<br>२. **मा. ॲड. मनोहर बन्सवाल**, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद<br>३. **मा. ॲड. अनिता शिऊरकर**, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद<br>४. **मा. ॲड. मेंघना चपळगावकर**, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद<br>५. **मा. प्रा. लखमले**, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद<br>६. **मा. श्री. महादेव डोंगरे**, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, औरंगाबाद. | साकार संस्थेचे कार्यालय, ज्योतीनगर, औरंगाबाद |



**अंगणवाडी सेविका बालकांचे वजन व उंची कसे घ्यायचे हे समजावून सांगतांना**




पहिल्या छाया चित्रात संस्थेतील कर्मचारी यांची रक्त तपासणी करतांना श्री लॅबचे, लॅब टेक्नीशियन मीर्झा व दुस-या छाया चित्रात आरोग्य तपासणी करतांना डॉ. वीणा पानट मॅडम





शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी), औरंगाबाद येथे निराधार/अनाथ/बेवारस/ जैविक पालकांनी सोडुन दिलेले/परित्यागीत बाळ/बालक सापडले किंवा एखादी कुमारी माता/गरोदर माता/विधवा माता तीला बाळ नको असेल तर आपण आमच्याशी संपर्क करुन त्यांची मदत करु शकता अश्या फलकाचे अनावरण







दत्तक जाणीव जागृति सप्ताह समारोप समारंभ बाल कल्याण समिती व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला

## देणे समाजाचे या कार्यक्रमांतर्गत सामाजिक कार्य करणा-या संस्थासाठी ऑनलाईन प्रदर्शन

समाजाप्रती आपण काही 'देण' लागतो, ही भावना समाजातील सर्व लोकांमध्ये रुजविण्याच्या दृष्टीने पुणे येथील ऑर्टिस्ट्री या संस्थेच्या वीणाताई गोखले, यांनी गेल्या पंधरा वर्षापासून 'देणे समाजाचे' हा उपक्रम सुरु केला. यात दरवर्षी पितृपंधरवड्या तील शेवटच्या तीन दिवसात, महाराष्ट्रातील सामाजिक संस्थांचे पुणे येथे प्रदर्शन भरविले जाते व समाजाप्रती संवेदनशील व्यक्ती या प्रदर्शनास भेटी देऊन मुक्तहस्ताने त्यांना रुचलेल्या सामाजिक कार्यास ते देणगी देतात. या प्रदर्शनासाठी निवड केलेल्या प्रत्येक संस्थेस सतत दोन वर्ष, समाजापर्यंत आपलं कार्य पोहोचवण्याची संधी प्राप्त होते. साकार संस्थेचं, २०२०-२१ हे दुसरे वर्ष होते. करोना चा जास्त प्रादुर्भाव असलेल्या पुणे शहरात यंदा हे प्रदर्शन भरणे शक्य नाही असे प्रकर्षाने जाणवल्याने वीणाताईंनी या उपक्रमास खंड पडू न देता, ऑनलाइन पद्धतीने आयोजित करून, देशातील व देशाबाहेरील सर्वच नागरिकांसाठी हे प्रदर्शन खुले करून दिले. परिणामी साकार संस्थेचे कार्य, देशांतर्गत व देशाबाहेरील असंख्य लोकांपर्यंत पोहोचले.

## सामाजिक दायित्व (CSR) अतंर्गत साकारला मदत

### औरंगाबाद इलेक्ट्रीकल्स प्रायव्हेट लिमिटेड, औरंगाबाद

औरंगाबाद शहरातील नामांकित कंपनी औरंगाबाद इलेक्ट्रीकल्स प्रा. लि., औरंगाबाद येथील वरिष्ठ अधिका-यांनी साकार संस्थेस भेट देऊन संस्थेच्या शिशु गृहाच्या कामकाजाविषयी माहिती घेतली व साकारचे कामकाज बघून समाधान व्यक्त केले. आणि शिशु गृहातील सुविधांसाठी आर्थिक सहाय करण्याविषयी शिफारस केली. औरंगाबाद इलेक्ट्रीकल्स प्रा. लि., कंपनी तर्फे साकार CSR अंतर्गत तीन वर्षासाठी (२०२० ) निधी मंजुर करण्यात आला.

### मॅन ऐनर्जी सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, औरंगाबाद

औरंगाबाद शहरातील नामाकित कंपनी मॅन ऐनर्जी सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, वाळुज, औरंगाबाद, येथील वरिष्ठ अधिकारी यांनी संस्थेस भेट देऊन यंदाही (२०२०-२०२१), साकार संस्थेस CSR अंतर्गत भरीव आर्थिक मदत केली.

### महिंद्रा टेक फाऊंडेशन, पुणे

पुणे शहरातील, धर्मादाय क्षेत्रात कार्य करणा-या, महिंद्रा टेक फाऊंडेशन येथील अधिका-यानी व त्यांच्या सहका-यांनी साकार संस्थेस भेट देऊन करोनाच्या प्रादुर्भावामुळे, उद्भवणा-या परिस्थीतीचा आढावा घेतला. आणि बाळांना आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक सामान व लॅक्टोजनचे दुधाचे डबे, व धान्य गांधी जयंतीच्या निमित्ताने दिले.

# संस्था तपासणी भेटी

| अ.क्र. | दिनांक | भेट देणा-या अधिका-यांचे नाव, पद व विभाग |
|---|---|---|
| १ | ०९/०४/२०२० | १. श्री. दिपक बजारे, समाजकार्यकर्ता, व जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद<br>२. श्रीमती कल्पना मोहिते, पी.ओ.आय.सी., जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद. |
| २ | ०५/०६/२०२० | १. मा. श्रीमती टि. झी. मिटकरी, जिल्हा न्यायाधीश -५, जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद.<br>२. मा. श्रीमती सूर्यवंशी, जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद. |
| ३ | २२/०७/२०२० | ३. श्री. महादेव डोगरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद<br>४. श्री. दिपक बजारे, समाजकार्यकर्ता, व जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद. |
| ४ | २१/०८/२०२० | १. श्री. व्ही. भी. विघ्ने, परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, औरंगाबाद.<br>२. श्रीमती एस. एम. इंगळे, कायदा व परीविक्षा अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद.<br>३. श्री. एम. टी. खंडाळे, समाजकार्यकर्ता, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद. |
| ५ | ३०/१०/२०२० | १. श्री. महादेव डोगरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद<br>४. श्री. व्ही. भी. विघ्ने, परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, औरंगाबाद. |
| ६ | ०९/१२/२०२० | १. ॲड. ज्योती पत्की अध्यक्ष, बाल कल्याण समिती, औरंगाबाद.<br>२. ॲड. मनोहर बन्सवाल, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद.<br>३. ॲड. मेघना चपळगावकर, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद.<br>४. ॲड. अनिता शिऊरकर, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद. |
| ७ | ०९/१२/२०२० | १. ॲड. ज्योती पत्की अध्यक्ष, बाल कल्याण समिती, औरंगाबाद.<br>२. ॲड. व्ही. पी. कुलकर्णी, सदस्य, जे जे बी.<br>३. श्री. व्ही. भी. विघ्ने, परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, औरंगाबाद. |
| ८ | ३१/०३/२०२१ | १. ॲड. मनोहर बन्सवाल, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद.<br>२. ॲड. मेघना चपळगावकर, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद.<br>३. ॲड. अनिता शिऊरकर, सदस्य, बाल कल्याण समिती, औरंगाबाद. |

२०२० - २०२१ या साली करोनाचा प्रादुर्भाव असल्याने शासनाच्या तपासणी पथकाच्या भेटी साकार संस्थेत वारंवार झाल्या, त्यावेळी त्यांनी पाहणी करुन, साकारच्या कामाची वाखाणणी केली.

# विविध उपक्रम

करोना काळात संस्थेत विविध कार्यक्रम आयोजित करण्यास मर्यादा असल्या तरी विविध नियमित उपक्रमांचे आयोजन बालकांच्या आरोग्याची काळजी घेऊनच केले गेले. संपूर्ण वर्षभरातील कार्यक्रमांची माहिती खालील प्रमाणे दिली आहे.

# नियमीत उपक्रम

## १. जागतिक मातृदिन -

जागतिक मातृदिन-दरवर्षीप्रमाणेच यंदाही दिनांक 10 मे 2020 रोजी, साकार संस्थेत साजरा केला गेला. साकार शिशू गृहातील बाळांसाठी, 'आया' हीच 'माता' असल्याने, तिची विशेष "जबाबदारी आणि कर्तव्य" याविषयी संस्थेच्या अध्यक्ष सविता पानट यांनी सर्व आयांना मार्गदर्शन केले. विशेषतः करोना काळात ,आयांना वैयक्तिक स्वच्छता व आहार याबाबत जागृत राहण्याविषयी सांगून, बालकांची स्वच्छता, शिशु गृहाची स्वच्छता आणि बालकांचे सुदृढ आरोग्य, याला अग्रक्रम देण्याविषयी त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनात भर दिला. कार्यक्रमाच्या शेवटी आयांच्या अविरत आणि निस्पृह सेवेबद्दल, त्यांना भेटवस्तू देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

## २. जागतिक योग दिवस

दि. २१ जुन २०२० रोजी जागतिक योगदिनाचे औचित्य साधून साकार परिवारासाठी योग शिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे व योगा प्रशिक्षक म्हणून संजना नानीवडेकर या उपस्थित होत्या. यावेळी संजना नानीवडेकर यांनी ०२ तासाच्या वेळात ०८ योगासने करुन दाखवली व उपस्थितांकडून आणि आयाकडून प्रात्याक्षिक करुन घेतले. तसेच त्यांनी मुद्रा, साधना, श्वसन, प्राणायाम व ध्यान यांचे महत्व सर्वांना समजावून सांगितले. आणि योगामुळे संयम आणि शांती प्राप्त होते असे त्यांनी सांगितले.

साकारच्या सचिव व कोषाध्यक्ष यांनी योगादिवस साजरा करण्यामागील उददेश समजावून सांगितला. तसेच सध्याचा कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव बघता योगामुळे आपल्याला किती फायदे होऊ शकतात व एखादे काम करतांना हवा असलेला आत्मविश्वास मिळविण्यात योगाची कशाप्रकारे मदत होते हे सांगितले.





संस्थेतील आयांना योगाचे धडे देतांना संजना नानीवडेकर

## ३. जन्माष्टमी/श्रीकृष्ण जयंती

दत्तकाचे द्योतक मानल्या जाणा-या श्रीकृष्णाची जयंती म्हणजेच जन्माष्टमी कार्यक्रम होय. साकार संस्थेत नियमितपणे या दिवशी हा कार्यक्रम साजरा केला जातो. या वर्षी मात्र कार्यक्रमाचे स्वरुप छोटेखानी होते. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी श्रीकृष्ण जयंतीचा कार्यक्रम दि. २४ ऑगस्ट २०२० रोजी साकार संस्थेच्या कार्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेतील बालगोपालांना राधा - कृष्णाचा साज घालण्यात आला होता.

कार्यक्रमास संस्थेतील कर्मचारी व आया उपस्थित होत्या आणि ऑनलाईन पध्दतीने संस्थेच्या सचिव, कोषाध्यक्ष व सर्व सदस्य या कार्यक्रमास हजर होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेतील बालगोपालांच्या हस्ते दहिहंडी फोडण्यात आली.





**संस्थेतील बालकांनसोबत जन्माष्टमीचा कार्यक्रम साजर करण्यात आला. त्यावेळेस संस्थेतील एका बालिकेस कृष्ण करण्यात आले होते.**

## ४. महिला दिन

दि. ८ मार्च २०२१ रोजी साकार संस्थेत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष साकारच्या सचिव होत्या. कार्यक्रमाच्या निमित्ताने आयांना व कर्मचा-यांना महिलांच्या सुरक्षिततेबाबत आणि महिलांच्या संक्षमीकरणासाठी महिलांनाच करावे लागणारे प्रयत्न या बाबत कार्यक्रमाच्या अध्यक्षा साकारच्या सचिव यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास सर्व कार्यकारी मंडळातील सदस्य उपस्थित होते. त्यांनीही सर्वाना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## ५. संस्थेतील बालकांसाठी सहल

दि. १९ फेब्रुवारी २०२१ रोजी साकार संस्थेतील ०३ ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना औरंगाबाद शहरातील पल्लवांकुर नर्सरी येथे सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पल्लवांकुर नर्सरी या ठिकाणी बालकांनी विविध प्रकारची झाडे बघीतली. व तेथे मुलांसाठी खेळण्याचे विविध प्रकारची खेळणी होती. त्या खेळण्याचा आनंद मुलांनी चांगल्या प्रकारे घेतला. मोकळया, नैसर्गिक वातावरणात स्वच्छंदपणे बागडल्यानंतर संस्थेनेच सोबत दिलेल्या चवदार पदार्थांचा येथेच्छ आस्वाद सर्व बाल गोपालांनी घेतला.  सहलीवरुन परततांना त्यांच्या चेह-यावर सहलीचा आनंद खुलुन दिसत होता.

# विशेष उपक्रम

## १. कोरोना महामारीचा कसा सामना करायचा यावर कार्यशाळा

दि. ०४ एप्रिल २०२० रोजी आयासाठी साकारच्या बालरोग तज्ञ डॉ. रोशनी सोधी व डॉ. प्राची पटेल मॅडमनी करोनाचा वाढता प्रभाव बघता, त्यावर कार्यशाळा घेतली. यात ज्या आया बाळांचा सांभाळ करतात, त्यांनी त्यांची स्वतःची व संस्थेतील बालकांची घ्यावयाची काळजी, याबाबत मार्गदर्शन केले.

१. आयांनी शिशु गृहात प्रवेश करण्यापूर्वी स्वच्छ कपडे घालुन, हात स्वच्छ करुनच प्रवेश करावा. शिशु गृहातील बाळांना करोनाचा संसर्ग होऊ नये यासाठी कशी काळजी घ्यावी. हे प्रामख्याने सदरील कार्यशाळेत सांगण्यात आले.
२. एखादया बाळाला सर्दी खोकला, ताप असल्यास त्या बाळाला इतर बाळांपासून वेगळे आयसोलेशनमध्ये ठेवावे जेणे करुन इतर बाळांना त्यांचा संसर्ग होणार नाही.
३. ऋतुप्रमाणे बाळांच्या रुममधील तापमान योग्य वातावरणानुसार ठेवावे.
४. हवा खेळती राहील यासाठी खिडक्या नेहमी उघडया ठेवाव्यात.
५. नवजात बालकाच्या विकासासाठी Intervention आणि Stimulation देण्यात यावे.
६. बाळांसोबत सतत बोलणे, गप्पा मारणे, मांडिवर खेळवणे, इत्यादी करत असतांना, स्वच्छता बाळगावी.
७. कमी वजनाच्या नवजात बालकाची विशेष काळजी घ्यावी.त्यांना उबदार ठेवावे व सतत लक्ष ठेवावे.
८. नवजात बालकांची चांगली काळजी घेण्यासाठी वेगवेगळया कर्मचारी, डॉक्टर यांच्यामध्ये संवाद साधावा.
९. बाळांच्या आरोग्याविषयी जागरुक असावे. तक्रारी आढळल्यास त्वरीत संबंधीतांना कळवणे.

व अनेक महत्वाच्या सुचना डॉक्टरांनी, आया, नर्स व कर्मचारी यांना दिल्या.

# २. कोरोना वायरस - समज, गैरसमज व त्याविषयी घ्यावयाची काळजी

दि. २० एप्रिल २०२० रोजी साकार संस्थेत काम करणा-या आया व कर्मचारी यांच्यासाठी कोविड १९ या महामारीमुळे उदभवलेल्या प्रसगाला सामोरे कसे जायचे या बदद्ल स्त्रीरोग तज्ञ डॉ. वीणा पानट यांनी आरोग्या संदर्भात मार्गदर्शन कार्यशाळा घेतली. यात डॉ. वीणा पानट यांनी करोना वायरस बदद्ल समज - गैरसमज त्या विषयी घ्यावयाची काळजी या बाबीची सखोल माहिती सांगितली.

१. सर्दी - खोकला असल्यास शिंकतांना, खोकतांना रुमालाचा वापर करणे.
२. हातात हात न घेणे, हात सतत सॅनीटायझर, हॅन्डवॉश किवा साबणाने स्वच्छ धुवावे.
३. तोडाला नेहमी मास्क लावावे.
४. बाळांना हाताळतांना हॅण्ड ग्लोजचा वापर करावा.
५. वापरावयच्या वस्तु स्वच्छ करुनच वापरायला घेणे.
६. फरशी, टेबल डेटॉल व लायझॉलचा वापर करुन स्वच्छ करावी.
७. कपडे रोज स्वच्छ धुतलेलेच घालावेत.
८. शक्यतो गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, गेल्यास सामाजिक अंतर राखूनच मानवी व्यवहार करावे.

कोरोना या आजाराविषयी भिती न बाळगता सर्वांनी योग्य अशी स्वच्छता पाळावी व प्रतिकारशक्ती वाढविण्यास भर दयावा. सतत मास्कचा वापर करावा ही आपली स्वतःची जबाबदारी आहे. यासाठी सर्वांनी योग्य काळजी घेणे हाच उपाय कोरोना वायरस दुर ठेवण्यास प्रभावी ठरेल असे मत डॉ. वीणा पानट यांनी व्यक्त केले.

## ९. संस्थेतील मुलांसाठी विशेष शिक्षण

संस्थेतील ०३ ते ०६ वर्ष वयोगटाच्या बालकांसाठी २०२० - २०२१ या वर्षी विशेष उपक्रम राबविला. बालकांचा मानसिक, बौध्दीक आणि सामाजिक विकास साधून शिक्षणात गति प्राप्त करणे, हा उददेश या उपक्रमाचा होता. यात बौध्दीक खेळांवर भर देण्यात आला. तसेच बालकांकडुन विविध चित्रकला, त्यात रंग भरणे व बालकांव्दारे विविध व्यायाम करवून घेतले. मुलांसाठी, चाईल्ड डेव्हलपमेंट ॲण्ड लर्निग सेंटर गोल्ड - गिफट ऑफ लर्निग यांच्या वतीने घेण्यात आले. यासाठी विशेष प्रशिक्षीत शिक्षीक वर्ग नियुक्त करतण्यात आला होता.

# विविध प्रकल्प

## १. क्षितीज

### जानकी देवी ग्राम विकास संस्था संचलित समाज सेवा केंद्र बजाजनगर-राजंणगांव येथील किशोरवयीन मुलीना मार्गदर्शन

जानकी देवी ग्राम विकास संस्था संचलित समाज सेवा केंद्र, बजाज नगर, औरंगाबाद व साकारच्या वतीने एकुण ०९ कार्यक्रम बजाजनगर व रांजणगाव येथे संपन्न झाले. ५ वी ते ०६ च्या विद्यार्थीनींना कुमारवयातील शारिरीक व मानसिक बदल, सुदृढ वाढीसाठी संकस आणि संतुलीत आहार, मासिक पाळीमध्ये घ्यावयाची काळजी आणि 'गुड टच व बॅड टच' याविषयी अभिनय आणि दृकश्राव्य माध्यमाच्या व्दारे प्रभावी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मुल्य शिक्षणाची गरज सांगुन मानवीमुल्य स्वतःत विकसीत कशी करावी याबाबतही मार्गदशन केले. तसेच विद्यार्थ्यीनींच्या मातांना कुमारवयातील संभाव्य धोके सांगुन व पाल्याशी कसा संवाद साधायचा याबाबत माता मेळाव्यात मातांना आवश्यक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थीनींचा प्रतिसाद छान मिळाला व त्यांच्या शंकेचे निराकरण ही चांगल्यापकारे करण्यात आले. सामारोपाच्या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षक वृद उपस्थित होते. या प्रसंगी साकारच्या 'क्षितीज' अंतर्गत होत असलेल्या अशा कार्यक्रमांची गरज आहे असे नमूद केले, व जास्तीत जास्त विद्यार्थीनीना त्यांचा लाभ घ्यावा असे सुचित केले.

क्षितिज हा कार्यक्रम साकारच्या सदस्या वैशाली अवलगांवकर, आणि साकारच्या समाजकार्यकर्ती अश्विनी भूजाडे व समाज सेवा केद्रच्या शुभांगी ताई यांनी यशस्वीपणे पार पाडला.

**क्षितिज**

| अ. क्र. | दिनांक | शाळेचे/कॉलेजचे नाव व पत्ता | विद्याथी संख्या |
|---|---|---|---|
| १ | २३/१२/२०२० | त्रिमुत्री जिल्हा परिषद उर्दू शाळा, शहाजापूर | २९ |
| २ | २३/१२/२०२० | शिवतेज संस्कार प्रबाधिनी विद्यालय, बजाजनगर | ६० |
| ३ | २५/१२/२०२० | लिटील एजल स्कुल, बजाजनगर | ८४ |
| ४ | २८/०१/२०२१ | शिवाजी विद्यालय, रांजनगांव | ६९ |
| ५ | ३१/०१/२०२१ | तनवाणी ज्युनिअर कॉलेज, मोहटा देवी मंदिर जवळ, बजाजनगर | ६८ |

**माता मेळावे**

| अ. क्र. | दिनांक | वसाहतीचे नाव व पत्ता | महिला संख्या |
|---|---|---|---|
| १ | २१/१२/२०२० | इंद्रप्रस्थ कॉलनी, राजंणगाव | १४ |
| २ | २४/१२/२०२० | वैद्यनाथ चौक, बजाजनगर | ३१ |
| ३ | २७/०१/२०२१ | देवगिरी कॉलनी, बजाजनगर | ६२ |
| ४ | ०५/०२/२०२१ | साई मंदिर, बजाजनगर | ३२ |



मुलांना व पालकांना मार्गदर्शन करतांना वैशाली अवलगांवकर व समाज सेवा केद्रांच्या शुभांगी ताई.

# कृतज्ञता

## दत्तक विधान कार्यात साकारला सक्रिय सहकार्य देणा-या आमच्या सर्व भागीदाराचे मनापासून आभार

## सहकार्य करणा-या शासकीय संस्था

| | | | |
|---|---|---|---|
| १ | केंद्रिय दत्तक संसाधन प्राधिकरण (कारा), नवी दिल्ली. | ९ | बाल कल्याण समिती, औरंगाबाद. |
| २ | गृह मंत्रालय, भारत सरकार | १० | एकात्मिक बाल संरक्षण योजना, पुणे. |
| ३ | महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार | ११ | जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, औरंगाबाद. |
| ४ | महाराष्ट्र शासन | १२ | पोलिस आयुक्तालय, औरंगाबाद |
| ५ | महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. | १३ | सर्व पोलिस स्टेशन आणि तपास पथके, औरंगाबाद. |
| ६ | महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था - सारा, पुणे. | १४ | औरंगाबाद महानगर पालिका आणि वार्ड कार्यालय ड, औरंगाबाद. |
| ७ | विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग, औरंगाबाद विभाग कार्यालय , औरंगाबाद. | १५ | नोंदणी विभाग कार्यालय, जिल्हाधीकारी कार्यालय, औरंगाबाद. |
| ८ | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय , औरंगाबाद. | | |

## सहकार्य करणा-या सामाजिक व शैक्षणिक संस्था

| | |
|---|---|
| १ | इंडीयन असोसिएशन फॉर प्रमोशन ऑफ अॅडोप्शन अॅण्ड चाईल्ड वेलफेअर, वरदान, नागपूर |
| २ | इंडीयन असोसिएशन फॉर प्रमोशन ऑफ अॅडोप्शन अॅण्ड चाईल्ड वेलफेअर, मुंबई. |
| ३ | स्पार्क, पुणे |
| ४ | समाजकार्य महाविद्यालय, औरंगाबाद. |
| ५ | सेजल, औरंगाबाद. |
| ६ | अनंत भालेराव विद्यामंदिर, औरंगाबाद. |
| ७ | जानकी देवी ग्राम विकास संस्था संचलित समाज सेवा केंद, वाळुज, औरंगाबाद. |

## वैद्यकीय सुविधा पुरविणा-या संस्था

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अमृत बाल रुग्णालय, औरंगाबाद. | ८ | तोतला हॉस्पीटल, औरंगाबाद. |
| २ | महात्मा गांधी मिशन महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद. | ९ | मंगल मेडी सेंटर, औरंगाबाद. |
| ३ | शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद. | १० | दत्ताजी भाले रक्त पेढी, औरंगाबाद. |
| ४ | कमलनयन बजाज हॉस्पीटल, औरंगाबाद. | ११ | चौबे हॉस्पीटल, औरंगाबाद. |
| ५ | एलोरा डायग्नोस्टीक सेंटर, औरंगाबाद. | १२ | स्वरुप मेडीकल व सर्जिकल, औरंगाबाद |
| ६ | माणिक हॉस्पीटल, औरंगाबाद. | १३ | काळे पॅथालॉजी लॅब, औरंगाबाद. |
| ७ | आयकॉन सेंटर, औरंगाबाद. | | |

# वृत्तपत्र समूह

| | | | |
|---|---|---|---|
| १ | दैनिक लोकसत्ता, औरंगाबाद | ८ | ए.बी.पी. माझा, औरंगाबाद. |
| २ | दैनिक भास्कर ग्रुप - दैनिक दिव्य मराठी, औरंगाबाद. | ९ | एम.सी.एन., औरंगाबाद. |
| ३ | दैनिक सकाळ, औरंगाबाद | १० | आकाशवाणी, औरंगाबाद. |
| ४ | दैनिक पुण्यनगरी, औरंगाबाद. | ११ | झी टि.व्ही,, औरंगाबाद. |
| ५ | दैनिक लोकमत, औरंगाबाद. | १२ | दैनिक महाराष्ट्र टाईम्स, औरंगाबाद. |
| ६ | दैनिक सामना, औरंगाबाद. | १३ | सोशल मिडीया फोसबुक |
| ७ | द टाईम्स ऑफ इंडिया, औरंगाबाद. | १४ | ९३.४ एफ. एम. रेडीओ |

# सेवा कार्य योगदान

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पल्लवांकुर नर्सरी, औरंगाबाद. | ६ | रेणुका इन्टरप्रायजेस नेसले मिल्क पावडर वितरक, औरंगाबाद. |
| २ | मोहन मुळे, अक्षदा ग्लास अॅण्ड अॅल्युमिनीयम, औरंगाबाद. | ७ | सौ. सोनाली प्रताप धोपटे व श्री. प्रताप धोपटे, वास्तूरचनाकार, औरंगाबाद. |
| ३ | साहिल फोटो स्टुडीओ, औरंगाबाद. | ८ | श्री. इलेक्ट्रिकल्स, औरंगाबाद. |
| ४ | श्री. दत्ता पवार, प्राची कन्सलटन्सी, औरंगाबाद. | ९ | सरस्वती प्रिंटींग प्रेस, मोती कारंजा, औरंगाबाद |
| ५ | सौ.अनुराधा देवळांणकर, औरंगाबाद | | |

# इतर सेवा

## बाल आरोग्य सेवा

१. डॉ. प्राची पटेल, मिश्रा चिल्ड्रन हॉस्पीटल, औरंगाबाद.
२. डॉ. रोशनी सोधी, केवल केअर बाल रुग्णालय, औरंगाबाद.
३. डॉ. मंदार देशपांडे, अमृत बाल रुग्णालय, औरंगाबाद.
४. डॉ. मंगेश पानट, ऑर्थोपेडीक तज्ञ, पानट हॉस्पीटल, औरंगाबाद.
५. डॉ. अंतरा देशमुख, फिजिओथेरपीस्ट, औरंगाबाद.
६. डॉ. प्रिया भाले, राजीव स्पीच थेरपी सेंटर, औरंगाबाद.
७. डॉ. मधुरा आन्विकर, मानसशास्त्रज्ञ, आय कॉन, समर्थ नगर, औरंगाबाद.
८. डॉ. उदय कुलकर्णी, स्किनस्पेशालीस्ट, औरंगाबाद.
९. डॉ. वैशाली अष्टपुत्रे, अष्टपुत्रे दातांचा दवाखाना, औरंगाबाद.
१०. डॉ. नळगिरकर, नेत्र तज्ञ, बजाज हॉस्पीटल, औरंगाबाद.

# कायदेविषयक सेवा

१. ॲड.सिध्देश देशमुख
२. ॲड. रेषा खेकाळे
३. ॲड. प्रिया गोंधळेकर

# सनदी लेखापाल सेवा

१. श्री. विवेक अभ्यंकर, चार्टर्ड अकौंटंट, औरंगाबाद.
२. श्री. असीम अभ्यंकर, चार्टर्ड अकौंटंट, औरंगाबाद.
३. श्री. दत्ता पवार, प्राची कन्सलटन्सी, औरंगाबाद.

# अंतर्गत लेखा - मुल्यांकन

१. अजिंक्य सावजी, चार्टर्ड अकौंटंट, औरंगाबाद.
२. मिनल औंढेकर, चार्टर्ड अकौंटंट, औरंगाबाद.

# देणगी स्त्रोत

| | | | |
|---|---|---|---|
| १ | चॅरीटी ॲड फांऊडेशन इंडिया, दिल्ली. | १० | श्री. सबर बुरड, औरंगाबाद |
| २ | श्री. अजय अनिल भालवणकर, मुंबई. | ११ | डॉ. वीणा पानट, श्रेयनगर, औरंगाबाद |
| ३ | भागवत कॉमर्स क्लासेस, औरंगाबाद. | १२ | श्री. सुनिल जबरस |
| ४ | श्री. प्रताप धोपटे, औरंगाबाद | १३ | श्री. अभिषेक मुळे, पुणे |
| ५ | श्री. राहुल पाटिल, पुणे | १४ | श्री. हनुमंत विध्वसं, पुणे |
| ६ | श्री. अनिरुध्द देशपांडे, औरंगाबाद | १५ | श्री. शंकर सुभेदार, पुणे |
| ७ | श्री. मनोज औरंगाबादकर, औरंगाबाद | १६ | श्री. वैभव देशपांडे, इंदौर (म.प्र.) |
| ८ | सार प्रिटींग प्रेस श्री. अतुल जोशी, औरंगाबाद. | १७ | भारतीय स्टेट बॅंक, दशमेशनगर, औरंगाबाद. |
| ९ | श्रीमती. लता पानट, औरंगाबाद | | |

# साकार कार्यकारी सदस्य



**डॉ. सविता पानट**
अध्यक्ष



**डॉ. निलिमा पांडे**
उपाध्यक्ष



**सुचित्रा देशपांडे**
सचिव



**राधिका मुळे**
कोषाध्यक्ष



**आशा नानीवडेकर**
कार्यकारी सदस्य



**नीलिमा सुभेदार**
कार्यकारी सदस्य



**सुहास वैद्य**
कार्यकारी सदस्य



**हेमलता आहिरवाडकर**
कार्यकारी सदस्य



**डॉ. वीणा पानट**
कार्यकारी सदस्य

---



**ॲड. अर्चना गोंधळेकर**
कायदेविषयक सल्लागार

# कर्मचारी वृंद

| अ.क. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | विजय  मगरे | व्यवस्थापक |
| २ | स्नेहल काळे | समाजकार्यकर्ती |
| ३ | अश्विनी भूजाडे | समाजकार्यकर्ती |
| ४ | रेखा तुरुकमारे | परिचारीका |
| ५ | छाया शर्मा | परिचारीका |
| ६ | राखी भोसले | चौकीदार |
| ७ | सुशिला गवई | आया |
| ८ | छाया वरेकर | आया |
| ९ | विजया वानखेडे | आया |
| १० | कल्पना वाघ | आया |
| ११ | पंचशिला काकडे | आया |
| १२ | उषा पठारे | आया |
| १३ | रुपनंदा दाडंगे | आया |
| १४ | कांचन वेलदोडे | आया |
| १५ | लता गायकवाड | आया |
| १६ | सुमन जावळे | आया |
| १७ | संगिता बनकर | आया |
| १८ | माया धारुले | आया |
| १९ | अनिता खंडाळे | आया |
| २० | जयश्री गारोले | आया |
| २१ | सुप्रिया खोतकर | आया |
| २२ | रेखा जाधव | आया |
| २३ | सोनाली भातपुडे | आया |
| २४ | सुरेखा लोखंडे | आया |
| २५ | सखु मोरे (अंशकालीन) | आया |
| २६ | कृष्णाबाई वाहुळ | स्वच्छता कर्मचारी |
| २७ | शिवशाला खरात | स्वच्छता कर्मचारी |
| २८ | अलका घुसळे | स्वच्छता कर्मचारी |

*****